Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 8.712
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2609I01VXIVP0007

e-ISSN No. 2394-8426
Monthly Issue
SEPT-2026
Issue– IX, Volume–XIV

ग्रामीण संस्कृतीच्या संक्रमणाचे चित्रण : आनंद यादव यांच्या *झोंबी* या कादंबरीचा एक चिकित्सक अभ्यास

प्रा. गंगा मारोतराव मोंढे
विद्यासागर कला महाविद्यालय
खैरी (बिजेवाडा), रामटेक
तह -रामटेक जि.नागपूर (महाराष्ट्र) -४४११०६
ई-मेल : ganga.mondhe88@gmail.com
भ्रमणध्वनी क्र. – ९६०७१५८७६५

सारांश

आनंद यादव यांची *झोंबी* ही मराठी आत्मकथनपर साहित्याच्या परंपरेतील महत्त्वाची कृती असून तिच्या केंद्रस्थानी लेखकाच्या बालपणापासून शिक्षणासाठी केलेल्या संघर्षापर्यंतचा अनुभवविश्वाचा प्रदीर्घ पट आहे. मात्र *झोंबी*कडे केवळ एका व्यक्तीच्या संघर्षकथेच्या रूपाने पाहिल्यास या कादंबरीचे साहित्यिक मर्म पूर्णपणे उलगडत नाही. या कृतीतून एका विशिष्ट काळातील ग्रामीण जीवनाचे बदलते रूप, शेतीभोवती उभे राहिलेले जग, बैल आणि माणूस यांचे जिव्हाळ्याचे नाते, गावातील सण-उत्सव, तमाशा, सोंगी भजन, ओव्या, जात्याची घरघर, मौखिक परंपरा, कष्टकरी जीवन, गरिबी, अंधश्रद्धा, कुटुंबातील ताणतणाव आणि शिक्षणाची ओढ यांचे अत्यंत जिवंत चित्रण आढळते. म्हणूनच *झोंबी* ही एका व्यक्तीची कथा असतानाच बदलत्या ग्रामीण जगाची स्मरणकथा ठरते.

या कादंबरीत पारंपरिक ग्रामीण संस्कृती एका दिवसात नाहीशी होत नाही. तिच्या अंगावर नव्या काळाचे थर चढत जातात. शेतीच्या कामात बदल होतो, यंत्रे येतात, पिठाच्या गिरणीमुळे जात्याची घरघर थांबते, ओव्या हरवतात आणि रेडिओ गावच्या घरात प्रवेश करतो. या बदलांकडे यादव केवळ प्रगतीच्या किंवा ऱ्हासाच्या एका सरळ चौकटीतून पाहत नाहीत. उलट, नव्या जगाने काही दिले आणि काही हिरावून घेतले, ही जाणीव त्यांच्या लेखनात सतत जाणवते. "काही मिळवायचे आणि काही गमवायचे" हे सूत्र *झोंबी*च्या ग्रामीण संस्कृतीविषयक चिंतनाचा मध्यबिंदू ठरते.

शेती, श्रम आणि शिक्षण यांच्यातील संघर्षातून आनंदाचे व्यक्तिमत्त्व घडते. एका बाजूला मळ्यातील कामासाठी त्याची गरज आहे; दुसऱ्या बाजूला पुस्तकांच्या जगाची त्याला ओढ आहे. त्यामुळे शाळा त्याच्यासाठी केवळ शिक्षणाचे ठिकाण न राहता गावाच्या पलीकडील जगाकडे उघडणारी खिडकी बनते. *झोंबी*मध्ये ग्रामीण संस्कृतीचे संक्रमण म्हणून दिसणारा हा बदल केवळ बाह्य जगण्यातील बदल नाही; तो माणसाच्या आकांक्षा, स्मृती, नातेसंबंध आणि जगाकडे पाहण्याच्या दृष्टीत घडणारा बदल आहे. प्रस्तुत अभ्यासात याच बदलत्या ग्रामीण जीवनाचे साहित्यिक स्वरूप, त्यातील अंतर्विरोध आणि आनंद यादव यांच्या निवेदनशैलीतील त्याचे कलात्मक रूप यांचा चिकित्सक विचार केला आहे.

मुख्य शब्द : आनंद यादव, *झोंबी*, ग्रामीण संस्कृती, संक्रमण, शेती, लोकपरंपरा, ओवी, शिक्षण, ग्रामीण जीवन, सांस्कृतिक स्मृती.

प्रस्तावना

मराठी साहित्यात ग्रामीण जीवनाचे चित्रण ही केवळ निसर्गरम्य गावाची किंवा शेतीच्या हिरवाईची कथा नाही. गाव म्हणजे माती, श्रम, दारिद्र्य, नाती, रूढी, सण, दुःख, कष्ट, स्वप्ने आणि बदल यांची गुंतागुंत. गावातील जीवन बाहेरून पाहताना साधे वाटते; परंतु त्या साधेपणाच्या आत अनेक संघर्ष दडलेले असतात. आनंद यादव यांच्या *झोंबी*मध्ये हे जीवन आतून अनुभवलेले असल्यामुळे त्याला कृत्रिम ग्रामीण रंग चढवण्याची गरज पडत नाही. मातीचा वास, बैलांच्या अंगावरचा घाम, मळ्यातील कष्ट, आईच्या हातची भाकर, सणाची छोटीशी हौस, शाळेची ओढ आणि गरिबीची सततची सावली—या साऱ्यांतून ग्रामीण जीवनाची खरी प्रतिमा उभी राहते.

*झोंबी*चे वैशिष्ट्य असे की, तिच्या केंद्रस्थानी असलेला आनंद हा केवळ स्वतःच्या आयुष्याचा मागोवा घेणारा निवेदक नाही. त्याच्या स्मृतींमधून त्याचे गाव पुन्हा उभे राहते. त्या गावात जुन्या परंपरा आहेत; पण त्याच वेळी नव्या जगाची चाहूलही आहे. म्हणूनच कादंबरीतील ग्रामीण जग स्थिर नाही. ते सतत बदलत आहे. जुन्या जगण्याच्या पद्धतींना नवे साधन भिडत आहे. जात्याची घरघर थांबून गिरणीचा आवाज ऐकू येतो. बैलांवर अवलंबून असलेल्या शेतीला यंत्रसंस्कृतीचा स्पर्श होतो. गावच्या सामुदायिक करमणुकीबरोबर रेडिओ घरात येतो. शिक्षणाची आस वाढते; पण त्याच शिक्षणाच्या वाटेत गरिबी अडथळा बनते.

यामुळे *झोंबी*चा अभ्यास करताना "संक्रमण" ही संकल्पना विशेष महत्त्वाची ठरते. संक्रमण म्हणजे एका अवस्थेचा शेवट आणि दुसऱ्या अवस्थेची सुरुवात एवढेच नव्हे. जुन्या जगाचा हात सुटत असतानाच नव्या जगाचा हात धरावा लागणे, ही संक्रमणाची खरी वेदना आहे. *झोंबी*मध्ये ही वेदना व्यक्तीच्या आयुष्यात, कुटुंबाच्या जगण्यात, शेतीच्या व्यवहारात, गावच्या उत्सवांत आणि लोकपरंपरांच्या स्मृतीत वेगवेगळ्या रूपांनी प्रकट होते.

यादवांच्या ग्रामीण जगाचे वैशिष्ट्य म्हणजे ते एकाच वेळी अनुभवात्मक आणि चिकित्सक आहे. लेखकाला त्या जगाशी भावनिक जवळीक आहे; कारण ते त्याचे स्वतःचे बालपण आहे. परंतु ही जवळीक त्याला त्या जगाचे दोष लपवू देत नाही. गरिबी, अंधश्रद्धा, जातीय-सामाजिक विषमता, कौटुंबिक दडपण, शिक्षणातील अडथळे आणि श्रमाचे ओझे यांचेही तितक्याच प्रामाणिकपणे चित्रण केले आहे. त्यामुळे झोंबीतील ग्रामीणता ही कल्पित ग्रामीणता नसून जगलेल्या अनुभवातून आलेली ग्रामीणता आहे.

१. *झोंबी* आणि ग्रामीण जीवन

*झोंबी*मध्ये गाव हे केवळ कथानकाची पार्श्वभूमी नाही. गाव हे स्वतः एक जिवंत पात्र आहे. त्याच्या वाटा आहेत, शेतं आहेत, मळे आहेत, देव आहेत, जत्रा आहेत, सण आहेत, भांडणं आहेत, आपुलकी आहे आणि संघर्षही आहे. आनंदाचे बालपण या जगात घडते. म्हणूनच त्याच्या व्यक्तिमत्त्वाची घडण समजून घ्यायची असेल तर त्याच्या गावाच्या जगण्याकडे पाहावे लागते.

या ग्रामीण जीवनात शेती ही उदरनिर्वाहाचे साधन असण्याबरोबरच जीवनाचा केंद्रबिंदू आहे. जमीन ही फक्त मालमत्ता नाही; तिच्याशी भावनिक नाते जोडलेले आहे. शेतात काम करणे म्हणजे कुटुंबाच्या अस्तित्वासाठी झगडणे. मळ्यातील प्रत्येक कामाला शरीराचा घाम आणि पोटाची भूक जोडलेली आहे. कादंबरीतील माणूस जमिनीवर जगतो आणि जमिनीशी झगडतो.

यादवांच्या निवेदनात शेतीचे काल्पनिक चित्र नाही. दुष्काळ, अपुरे अन्न, कष्ट, बैलांची उपासमार, घरातील गरिबी आणि मुलांच्या शिक्षणासाठी लागणारा पैसा यांची सततची जाणीव आहे. त्यामुळे ग्रामीण जीवनाचे चित्रण वास्तवाशी जोडलेले राहते. या वास्तवात माणसाची प्रतिष्ठा कधी कष्टातून उभी राहते, तर कधी गरिबीसमोर झुकते. याच कारणामुळे गावाचे चित्र झोंबीमध्ये बहुरंगी बनते. एका बाजूला श्रमातून उभे राहिलेले आत्मीय जग आहे; दुसरीकडे त्याच श्रमाचे शोषण करणाऱ्या परिस्थिती आहेत. एका बाजूला सामुदायिक सण आणि आनंद आहेत; दुसरीकडे उपासमार आणि आर्थिक विषमता आहे. त्यामुळे ग्रामीण जीवनाकडे पाहताना यादवांच्या दृष्टीला विरोधाभास सतत जाणवतो.

ग्रामीण जीवनातील नातीही या संस्कृतीचा महत्त्वाचा भाग आहेत. कुटुंब, शेजार, भावंडे, शेतातील सहकारी, गावातील विविध जाती-जमाती आणि सामुदायिक व्यवहार यांतून व्यक्तीचे जीवन आकार घेत असते. व्यक्तीचे स्वातंत्र्य पूर्णपणे वैयक्तिक नसते; ते कुटुंबाच्या आणि गावाच्या गरजांशी जोडलेले असते. आनंदाला शाळेतून परत बोलावण्यामागेही हीच सामूहिक गरज आहे.

२. शेती : मातीपासून 'उद्योगा'पर्यंत

*झोंबी*मध्ये ग्रामीण संस्कृतीतील बदल सर्वाधिक स्पष्टपणे शेतीच्या संदर्भात जाणवतो. परंपरेत जमीन ही 'आई' आहे. तिच्याशी माणसाचे नाते व्यवहारापेक्षा अधिक जिव्हाळ्याचे आहे. परंतु आधुनिकतेच्या स्पर्शाने शेतीकडे पाहण्याची दृष्टी बदलू लागते. यादव लिहितात -

"आता शेती ही देखील 'इंडस्ट्री' झाल्यामुळे, औद्योगिक संस्कृतीचे सारे गुणदोष शेती-उद्योगातही आले. जमीन हाही धान्य उत्पन्न करणारा कारखाना झाला." (यादव, २२)

या वाक्यांतून ग्रामीण जीवनाच्या बदलत्या मानसिकतेचे अत्यंत सूक्ष्म चित्र उभे राहते. 'जमीन' आणि 'कारखाना' या दोन प्रतिमा परस्परविरोधी वाटतात. जमीन म्हणजे माती, ऋतू, पाऊस, बीज, श्रम आणि भावबंध; तर कारखाना म्हणजे उत्पादन, यंत्र, गती आणि व्यवहार. यादव या दोन प्रतिमांना एकत्र आणतात आणि त्यातून बदलत्या शेतीचे चित्र रेखाटतात.

याच संदर्भात "भूमाता", "काळी आई" यांसारख्या भावपूर्ण प्रतिमा हळूहळू लुप्त होण्याची जाणीव लेखकाला होते. येथे बदलाचा प्रश्न केवळ शेतीच्या पद्धतीचा नाही; मातीला पाहण्याच्या दृष्टीचा आहे. पूर्वी जमीन माणसाच्या जगण्याचा अविभाज्य भाग होती; नव्या काळात ती उत्पादनाचे साधन म्हणून दिसू लागते. त्यामुळे ग्रामीण संस्कृतीतील भावबंधाच्या एका धाग्यावर आधुनिक व्यवहाराची सावली पडते.

मात्र यादव आधुनिक शेतीचा निषेध करीत नाहीत. आधुनिकतेमुळे उत्पादनक्षमता, श्रमबचत आणि जीवनातील सुविधा वाढू शकतात, ही शक्यता त्यांच्या जाणिवेत आहे. प्रश्न असा आहे की या बदलाच्या प्रक्रियेत पारंपरिक ग्रामीण जीवनातील कित्येक अनुभव, मूल्ये आणि सांस्कृतिक स्मृती नष्ट होतात. म्हणूनच झोंबीतील शेतीचा प्रश्न हा कृषितंत्राचा प्रश्न न राहता सांस्कृतिक परिवर्तनाचा प्रश्न बनतो. शेतीचे यांत्रिकीकरण माणूस आणि जमीन यांच्यातील नात्यालाही बदलते. बैल, नांगर, औत, मळा, ऋतू आणि श्रम यांच्या साहचर्यातून निर्माण झालेली शेतीची संस्कृती आधुनिक साधनांच्या आगमनाने बदलू लागते. या बदलामुळे कामाची पद्धत बदलते; त्याचबरोबर कामाशी संबंधित लोकपरंपराही हळूहळू मागे पडतात.

३. बैल : श्रमाचे आणि ग्रामीण स्मृतीचे प्रतीक

*झोंबी*तील बैल हे केवळ शेतीची साधने नाहीत. ते ग्रामीण जीवनाचे जिवंत सहचर आहेत. माणूस आणि बैल यांचे नाते कष्टातून, सवयींतून आणि परस्परावलंबनातून तयार झालेले आहे. बैलाला औताला जुंपणे, त्याला सांभाळणे, त्याच्या अंगावरून हात फिरवणे, त्याची भीती आणि त्याच्याशी

मैत्री—या साऱ्या अनुभवांतून ग्रामीण जीवनाचे सूक्ष्म जग उलगडते. कादंबरीत शिवाला बैलाशी जुळवून घेण्याची प्रक्रिया अत्यंत जिवंतपणे येते. बैलाच्या अंगावर हात फिरवून त्याला शांत करणे आणि नंतर वेसण घालणे, हा प्रसंग ग्रामीण श्रमसंस्कृतीतील अनुभवाचे महत्त्व दाखवतो.

यादवांच्या लेखनातील बैलांची तुलना माणसांशी होते आणि ती तुलना मनाला चटका लावते. एका ठिकाणी श्रीमंत शेतकऱ्यांची बैलं अंगावर तेज घेऊन, सजवलेली दिसतात; तर आनंदाच्या घरची बैलं उपासमारीने कृश झालेली असतात. लेखक म्हणतो -

"गावाचं वैभव बाहेर पडल्यागत वाटत होतं... आमचीबी बैलंच. कायम वाळून कोंज झालेली. त्यांच्या पोटापाण्याला कधी भरपूर मिळायचं नाही. आम्हा भणी-भावंडांसारखंच त्यांही नशिबी भरपूर कष्ट नि उपासमार आलेली असायची." (यादव, ३०२)

या उताऱ्यात बैल आणि माणूस यांच्यातील साम्य अत्यंत अर्थपूर्ण आहे. उपासमारीने कृश झालेली बैलं म्हणजे घरातील मुलांचेच जणू दुसरे रूप. त्यांच्या शरीरावरचे कष्ट आणि मुलांच्या शरीरावरचे कष्ट एकाच जीवनकथेचे दोन भाग बनतात. त्यामुळे बैल हे ग्रामीण दारिद्र्याचेही प्रतीक बनतात.

बैल आणि आनंद यांच्यातील नाते आणखी एका अर्थाने महत्त्वाचे आहे. आनंदाचे बालपण शेतीच्या जगात गेले आहे. त्यामुळे बैल त्याच्या बालपणीच्या स्मृतींचा अविभाज्य भाग आहेत. पुढे आधुनिक शेतीमध्ये बैलांचे महत्त्व कमी होत गेले तर त्या बदलाबरोबर आनंदाच्या बालपणातील एक जगही मागे पडते. म्हणून बैल हे ग्रामीण स्मृतीचे सांस्कृतिक प्रतीक ठरतात.

४. लोकजीवनाची रंगत : तमाशा, सोंगी भजन आणि सामुदायिक आनंद

*झोंबी*तील गाव गरिबीचे आहे; पण ते केवळ दुःखाने भरलेले नाही. त्याच्या जगण्यात आनंदाची छोटी छोटी बेटं आहेत. तमाशा, सोंगी भजन, जत्रा, उरूस, लग्नसमारंभ आणि सण या माध्यमांतून गावातील माणसांना दैनंदिन कष्टांपासून क्षणभर मुक्त होण्याची संधी मिळते. लेखक लिहितो -

"शिवाला बरोबर घेऊन मी एखादा तमाशा बघी; तर सगळ्यांना बरोबर घेऊन केनवडेकरांच्या वाड्यातली सोंगी भजनं बघे." (यादव ,२५२)

आणि पुढे -

"सगळी मिळून बघायला जाताना मनाला तरतरी आल्यागत होई. पावलं लगालगा पडत. सगळ्यांच्या तोंडावर हसू आणि उत्साह उमललेला असे... आंबलेली मनं स्वच्छ होऊन जात." (यादव ,२५२)

या वर्णनात ग्रामीण सामुदायिक जीवनाचा आत्मा दिसतो. दिवसभर श्रम करणारी माणसं रात्री तमाशा किंवा भजन पाहताना क्षणभर आपले दुःख विसरतात. करमणूक ही त्यांच्या जगण्यात विलास म्हणून येत नाही; ती थकलेल्या मनाला पुन्हा उभे करणारी शक्ती ठरते. लक्षणीय बाब म्हणजे गावात वर्षभर काही ना काही सामुदायिक कार्यक्रम सुरू असतात - लग्नापासून दिवाळीपर्यंत आणि उरुसापर्यंत. या प्रसंगांतून गावाचे सामूहिक मन दिसते.

५. जात्याची घरघर आणि ओवीचा हरवलेला स्वर

*झोंबी*च्या ग्रामीण संस्कृतीविषयक चिंतनातील सर्वांत हळवा आणि साहित्यिक भाग म्हणजे ओवीच्या लोपाचे वर्णन. पिठाची गिरणी येते आणि जात्याची घरघर थांबते. बाहेरून पाहता ही सुविधा आहे; परंतु यादवांना या बदलात एक हरवलेला स्वर ऐकू येतो. ते लिहितात -

"पिठाच्या गिरणीने नुसती जात्यांची घरघर संपवली नाही; तर त्या दळणाच्या जोडीने उमटणाऱ्या ओव्याही संपवल्या." (यादव, २२)

हे वाक्य *झोंबी*च्या संक्रमणाचे मर्म पकडते. जातं थांबते म्हणजे केवळ एक घरगुती काम सोपे होत नाही; त्या कामाबरोबर स्त्रियांच्या आवाजातून उमटणारी एक मौखिक काव्यपरंपरा देखील शांत होते. ओवी ही श्रमातून जन्मलेली कविता होती. दळणाच्या लयीत स्त्रीचे दुःख, हसू, संसार, प्रेम, उपेक्षा आणि आशा व्यक्त होत होती. गिरणीने श्रम कमी केला; परंतु त्या श्रमाशी जोडलेला स्वरही कमी झाला.

म्हणूनच आधुनिकतेकडे पाहताना यादवांची दृष्टी एकांगी नाही. नवे साधन जीवन सुलभ करते; पण जुन्या जीवनातील एखादा जिवंत धागा त्याबरोबर तुटतो. हीच संक्रमणाची शोकात्म जाणीव आहे. तथापि, जात्यावर दळणे ही स्त्रीच्या दृष्टीने श्रमसाध्य आणि वेळखाऊ प्रक्रिया होती. गिरणीमुळे हा श्रम कमी झाला. त्यामुळे आधुनिक साधनाचे आगमन स्त्रीच्या श्रमाच्या दृष्टीने सकारात्मकही आहे. परंतु यादवांचे निरीक्षण हे दाखवते की श्रम कमी झाला तरी त्या श्रमातून निर्माण होणारी सांस्कृतिक निर्मितीही कमी झाली. याच द्वंद्वातून संक्रमणाचे खरे स्वरूप उलगडते.

ओवीच्या लोपानंतर रेडिओचे आगमन हा *झोंबी*तील एक अत्यंत सूचक सांस्कृतिक क्षण आहे. यादव लिहितात -

"ओवी गेली आणि देवाची भजने आणि भूपाळ्यांनी, शहरे आणि खेडी यांचा रामप्रहर एकसाथ साजरा करणारा रेडिओ आला." (यादव, २२)

या वाक्यात जुन्या आणि नव्या जगाची दोन प्रतीके समोर येतात - ओवी आणि रेडिओ. ओवी घराच्या अंगणातून जन्मते; रेडिओ बाहेरच्या जगाचे आवाज घरात आणतो. त्यामुळे रेडिओ हा केवळ एक उपकरण नसून गावाच्या बंदिस्त जगात बाहेरील जगाची चाहूल घेऊन येणारा नवा आवाज आहे. यातून *झोंबी*तील बदलाचे स्वरूप स्पष्ट होते. जुन्या जगाची जागा नवे जग एकदम घेत नाही. काही आवाज मंदावतात आणि त्यांच्या जागी नवे आवाज ऐकू येतात. या बदलाला यादव अत्यंत संवेदनशीलपणे नोंदवतात.

६. "काही मिळवायचे आणि काही गमवायचे"

ग्रामीण संस्कृतीच्या संक्रमणाचा सर्वांत प्रभावी अर्थ *झोंबी*मध्ये पुढील वाक्यात संक्षिप्त होतो -

"मानवी समाजाच्या प्रवासाचा सारा इतिहास, काही मिळवायचे आणि काही गमवायचे अशाच सूत्राला धरून चाललेला दिसतो." (यादव, २२)

हे वाक्य कादंबरीच्या संपूर्ण अनुभवविश्वाला लागू पडते. गिरणीमुळे श्रम कमी झाले, पण ओवी हरवली. रेडिओ आला, पण गावच्या सामूहिक श्रवण-अनुभवाचे स्वरूप बदलले. शिक्षणाची दारे उघडली, पण त्या शिक्षणासाठी गरिबीशी झगडावे लागले. शेतीत नवी साधने आली, पण पारंपरिक श्रमसंबंध बदलले.

म्हणून *झोंबी*मध्ये संक्रमण म्हणजे केवळ प्रगतीची कथा नाही आणि केवळ ऱ्हासाचीही कथा नाही. ती मिळकतीबरोबर झालेल्या गमावण्याची कथा आहे. याच जाणिवेमुळे कादंबरीला स्मरणाचा करुण स्वर प्राप्त होतो. यादवांच्या विचारात परिवर्तनाची ही द्वंद्वात्मकता अत्यंत महत्त्वाची आहे. नवीन जग जुन्या जगाला पूर्णपणे नष्ट करत नाही; उलट जुन्या जगातील काही घटक स्मृतीच्या रूपाने नव्या जगात टिकून राहतात. म्हणून संक्रमण म्हणजे विस्मरण नसून पुनर्रचना आहे.

७. गावाची सांस्कृतिक स्मृती

आनंदाच्या बालपणातील गाव काळाच्या प्रवाहात मागे पडते. लेखकाच्या स्मृतीत ते गाव जिवंत आहे; परंतु वर्तमानात ते तस्से उरलेले नाही. त्यामुळे स्मृती ही *झोंबी*च्या रचनेतील महत्त्वाची शक्ती ठरते. यादव म्हणतात -

"आनंदचे बाळपण ज्या खेडेवजा गावात गेले ते गाव त्याला पुन्हा भेटणार नाही." (यादव, २२)

हे विधान अत्यंत साधे असूनही त्यात खोल दुःख आहे. 'गाव' म्हणजे फक्त भौगोलिक जागा नाही. त्या गावातले आवाज, चेहरे, सण, बैल, जात्याची घरघर, ओव्या, शेतातील कामे, माणसांची नाती आणि बालपणीच्या आठवणी मिळून एक गाव तयार होते. त्या घटकांपैकी काही नष्ट झाले की जागा तीच असली तरी अनुभवाचे गाव बदलते.

म्हणून *झोंबी* ही एका अर्थाने हरवत जाणाऱ्या ग्रामीण जगाची स्मृती जपणारी कृती आहे. लेखक भूतकाळाची पूजा करत नाही; पण त्याला विसरूही देत नाही.त्याची स्मृती ही चिकित्सक स्मृती आहे. ती भूतकाळातील माणुसकी जपते, पण त्याचबरोबर त्या भूतकाळातील अभाव आणि मर्यादाही दाखवते.

८. श्रमसंस्कृती आणि आनंदाचे बालपण

*झोंबी*तील आनंदाचे बालपण खेळण्यापेक्षा कामात अधिक जाते. मळ्यातील काम, जनावरांची राखण, शेतीची कामे आणि घरातील गरजा यांमुळे त्याचे बालपण लवकर संपते. एका ठिकाणी शाळा सुरू झाल्यानंतरही दादा त्याला शेतातील कामासाठी बोलावतो. "शाळा राहू दे" अशी परिस्थिती वारंवार निर्माण होते.

यादवांच्या आत्मकथनातील ही परिस्थिती अत्यंत अर्थपूर्ण आहे. बालपण म्हणजे सामान्यतः खेळ, शिक्षण, मित्र आणि स्वप्ने यांचा काळ मानला जातो; परंतु गरीब ग्रामीण मुलासाठी बालपणाचे स्वरूप वेगळे असते. त्याच्याकडून लहान वयातच श्रमाची अपेक्षा केली जाते. शेतातील काम आणि शाळेतील शिक्षण यांमध्ये आनंद सतत गुरफटलेला दिसतो. मळ्यात त्याचे शरीर आवश्यक आहे; शाळेत त्याचे मन धावत जाते. म्हणून त्याच्या जीवनातील संघर्ष हा केवळ 'शिक्षण विरुद्ध शेती' असा साधा संघर्ष नाही. तो शरीर आणि मन, वर्तमानाची गरज आणि भविष्याचे स्वप्न, कुटुंबाची अपेक्षा आणि वैयक्तिक आकांक्षा यांच्यातील संघर्ष आहे.

यादव या संघर्षाचे चित्रण बाहेरून करत नाहीत; ते आनंदाच्या अनुभवातून त्याला व्यक्त करतात. त्यामुळे शेतातील कामाचे वर्णन करताना शरीराचा थकवा जाणवतो आणि पुस्तक हातात घेताना मनाची उभारी जाणवते.

कादंबरीतील श्रमवर्णनामुळे वाचकाला ग्रामीण बालपणाच्या सुखदायक कल्पनेपासून दूर नेले जाते. ग्रामीण बालपण मोकळे, निसर्गाच्या सान्निध्यातले आणि आनंदी असेलच असे नाही. त्यामागे आर्थिक विवंचना आणि श्रमाचे कठोर वास्तव असू शकते, हीच *झोंबी*च्या कथनाची ताकद आहे.

९. शिक्षण : गावाच्या पलीकडे जाणारी वाट

*झोंबी*मध्ये शिक्षणाचे महत्त्व केवळ नोकरी किंवा आर्थिक उन्नतीपुरते मर्यादित नाही. शिक्षण म्हणजे आनंदासाठी दुसऱ्या जगाची ओळख. पुस्तक म्हणजे त्याच्या हातात आलेली नवी दृष्टी.

परंतु या वाटेवर गरिबी सतत उभी आहे. पुस्तके, वह्या, फी, कपडे आणि शाळेत जाण्यासाठी लागणारा वेळ—या सगळ्यांची किंमत गरीब कुटुंबाला मोजावी लागते. म्हणून शिक्षणाची इच्छा आणि पोटाची गरज यांच्यात संघर्ष निर्माण होतो.

कादंबरीत आनंदाला शाळेतून घरी बोलावले जाते तेव्हा तो विरोध करू शकत नाही. वडिलांच्या आवाजात घराच्या गरजेची सक्ती असते. "आता शाळेत तमाशा करण्यात काही अर्थ नाही," अशी त्याची अंतर्गत जाणीव होते आणि तो दप्तर घेऊन बाहेर पडतो.

हा प्रसंग केवळ एका मुलाची शाळा बुडण्याची घटना नाही. तो त्या काळातील गरीब ग्रामीण मुलाच्या स्वप्नासमोर उभ्या राहिलेल्या कठोर वास्तवाचा क्षण आहे. तरीही आनंदासाठी पुस्तकाचे जग आकर्षणाचे केंद्र बनते. त्याला गावाच्या मर्यादित अनुभवापलीकडे जाण्याची शक्यता शिक्षणातून दिसते. त्यामुळे शिक्षण हे त्याच्यासाठी सामाजिक गतिशीलतेचे साधन ठरते; पण त्याच वेळी ते सांस्कृतिक संक्रमणाचेही माध्यम बनते.

१०. शिक्षण आणि शाळेतील अनुभवासह घरातील संघर्ष

*झोंबी*मध्ये शाळेचे चित्र पूर्णपणे आदर्श नाही. काही शिक्षक विद्यार्थ्यांमध्ये प्रेम निर्माण करतात; तर काहींच्या कठोर वर्तनामुळे मुलांच्या मनात शाळेची भीती निर्माण होते. शिष्याला मास्तरांच्या मारामुळे शाळा कायमची सोडावी लागते. त्याची आई संतापून म्हणते -

"माझ्या फुटक्या नशिबात एवढंच पोरगं हाय. तेबी त्या मास्तराच्या मारानं दानाला जाईल. जळू दे ती शाळा. गरिबाच्या नशिबात कुटली आलीय ती?" (यादव, ८७)

या प्रसंगात आईच्या भाषेतून दारिद्र्याचे दुःख आणि शिक्षणाविषयीची असहायता व्यक्त होते. शाळा मुलाला पुढे नेणारी जागा असली तरी तिच्या कठोरतेमुळे गरीब मुलासाठी ती दूरची गोष्ट बनू शकते. शिष्याच्या शाळा सोडण्याबरोबर आनंदावरही वाईट संगतीचा परिणाम होतो आणि तो चोरीसारख्या कृतींकडे वळतो. यातून यादवांचा दृष्टिकोन स्पष्ट होतो—गरीब मुलाच्या आयुष्यातील चूक ही केवळ त्याची वैयक्तिक चूक नसते; तिच्यामागे त्याचे वातावरण, गरिबी, शिक्षणातील अडथळे आणि घरातील परिस्थिती असते. हा शाळेतील अनुभव पाठीशी असला तरी आनंदाच्या शिक्षणाला घरातून मिळणारा विरोध *झोंबी*मध्ये अनेक प्रसंगांतून व्यक्त होतो. वडिलांना शेतीसाठी मुलाची गरज आहे. त्यामुळे त्यांना पुस्तकापेक्षा नांगर अधिक महत्त्वाचा वाटतो. त्यांच्या दृष्टीने मुलाने शेतात काम करणे म्हणजे घराच्या जगण्याला हातभार लावणे. दुसरीकडे आनंदासाठी शिक्षण हे जग बदलण्याची शक्यता घेऊन येते. त्यामुळे त्याच्या मनात अस्वस्थता वाढत जाते. शेवटी वडिलांशी संघर्ष करताना तो शिक्षणासाठी ठाम उभा राहतो. कादंबरीच्या उत्तरार्धात त्याचा हा संघर्ष अत्यंत तीव्र होतो. पुस्तकांसाठी, शाळेसाठी आणि आपल्या स्वप्नासाठी तो मारही सहन करतो; आई त्याच्या बाजूने उभी राहते.

या संघर्षामुळे *झोंबी*तील 'झोंबी' ही केवळ शारीरिक किंवा आर्थिक झुंज राहत नाही. ती मनुष्याच्या आतल्या जगण्याची झुंज बनते—मातीशी जोडलेले जीवन स्वीकारायचे की पुस्तकातून उघडणाऱ्या नव्या वाटेचा शोध घ्यायचा, यातील संघर्ष. याच संघर्षातून त्याची जिद्द अधिक तीव्र होते. झोंबी या शीर्षकातील 'झुंज' याच अर्थाने समजून घेता येते. ही झुंज केवळ गरिबीविरुद्ध नाही; ती परिस्थितीने आखून दिलेल्या आयुष्याच्या मर्यादांविरुद्ध आहे.

११. आई : कष्ट, माया आणि घराची उब

*झोंबी*तील ग्रामीण स्त्रीचे चित्रण तिच्या दैनंदिन जगण्यातून घडते. आई ही केवळ घरातील स्त्री नाही; ती घराच्या जगण्याला आधार देणारी श्रमशील उपस्थिती आहे. मुलांची काळजी, घरातील कामे, शेतातील श्रम, गरिबीत संसार सांभाळणे आणि मुलांच्या छोट्या हौशी जपणे - या सगळ्यांतून तिचे व्यक्तिमत्त्व आकार घेते.

दादाच्या कठोर स्वभावामुळे मुलांना सतत काम करावे लागते, हे आईला जाणवते. म्हणूनच मुलांनी गावातील सण-उत्सवातील करमणूक पाहावी, अशी तिची इच्छा असते. दिवसभर काम करून रात्री थोडा वेळ तमाशा किंवा जत्रा पाहायला गेल्याने मुलांना पुन्हा काम करण्याची उभारी येईल, अशी तिची साधी पण माणुसकीची भूमिका आहे.

आईच्या व्यक्तिरेखेतून ग्रामीण स्त्रीचे जगणे मोठ्या घोषणांतून नव्हे तर छोट्या कृतींतून व्यक्त होते. ती मुलांच्या भुकेची काळजी घेते, त्यांना मारापासून वाचवते, त्यांच्या हौशी जपते आणि शिक्षणासाठी त्यांच्या बाजूने उभी राहते. त्यामुळे तिच्या व्यक्तिमत्त्वात ग्रामीण स्त्रीजीवनातील कष्ट आणि मायेचा दुहेरी स्वर ऐकू येतो.

१२. सण, जत्रा आणि गावचे सामूहिक मन

दिवाळी, उरूस, जत्रा, लग्नसमारंभ, तमाशा, सोंगी भजन अशा प्रसंगांतून गावातील जीवनाला रंग प्राप्त होतो. दैनंदिन कष्टांनी दमलेली माणसे या प्रसंगांतून काही काळ आनंद शोधतात. हे सांगताना लेखक लिहितो -

"सगळी मिळून बघायला जाताना मनाला तरतरी आल्यागत होई. पावलं लगालगा पडत. सगळ्यांच्या तोंडावर हसू आणि उत्साह उमललेला असे... आंबलेली मनं स्वच्छ होऊन जात." (यादव, *झोंबी*, २५२)

*झोंबी*तील सण मात्र संपन्नतेचे प्रतीक नाहीत. गरीब घरातील सणातही अभाव असतो. कपडे जुने असतात, खाण्यापिण्याची मर्यादा असते आणि शेतीचे काम थांबत नाही. तरीही सणाचा आनंद संपत नाही. यामुळे यादवांच्या ग्रामीण जगण्याला एकाच वेळी करुण आणि उत्सवी असे दोन स्वर प्राप्त होतात. याच द्वंद्वामुळे *झोंबी*चे ग्रामीण जीवन खरे वाटते. येथे दुःखाच्या शेजारी हसू आहे आणि उपासमारीच्या शेजारी सणाची छोटीशी हौस आहे.

१३. अंधश्रद्धा आणि ग्रामीण मन

ग्रामीण संस्कृतीचे चित्रण करताना यादव तिच्या मर्यादाही दाखवतात. भुताखेतांच्या कथा, अंगात येणे, भुतांचे भय, रूढ समजुती यांचा उल्लेख कादंबरीत आढळतो. लहान मुलांच्या मनावर या गोष्टींचा खोल परिणाम होतो. या अंधश्रद्धा केवळ विनोदाचा विषय म्हणून येत नाहीत. त्या ग्रामीण मनाच्या भीती, अज्ञान आणि अनुभवविश्वाचा भाग आहेत. त्यामुळे लेखक त्यांच्याकडे बाहेरून हसत पाहत नाही; तो त्यांना त्या काळातील जीवनाचा भाग म्हणून नोंदवतो. यामुळे *झोंबी*तील ग्रामीण संस्कृती एकसुरी राहत नाही. तिच्यात माणुसकी आहे, सामुदायिक आनंद आहे; पण त्याचबरोबर भीती, अंधश्रद्धा आणि रूढींची सावलीही आहे.

ग्रामीण संस्कृतीचे चित्रण करताना यादव तिच्या मर्यादाही दाखवतात. भुताखेतांच्या कथा, अंगात येणे, भुतांचे भय, रूढ समजुती यांचा उल्लेख कादंबरीत आढळतो. लहान मुलांच्या मनावर या गोष्टींचा खोल परिणाम होतो. या अंधश्रद्धा केवळ विनोदाचा विषय म्हणून येत नाहीत. त्या ग्रामीण मनाच्या भीती, अज्ञान आणि अनुभवविश्वाचा भाग आहेत. त्यामुळे लेखक त्यांच्याकडे बाहेरून हसत पाहत नाही; तो त्यांना त्या काळातील जीवनाचा भाग म्हणून नोंदवतो.

यातून झोंबीची वास्तववादी दृष्टी स्पष्ट होते. ग्रामीण जीवनात प्रेम, आपुलकी आणि सामुदायिकता आहे; पण त्याचबरोबर भीती, रूढी, अज्ञान आणि अंधश्रद्धाही आहेत. त्यामुळे ग्रामीण संस्कृतीला आदर्शीकृत न करता तिचे बहुआयामी चित्रण करणे हे यादवांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

१४. आर्थिक विषमता आणि ग्रामीण जीवनाचे दोन चेहरे

*झोंबी*तील गावात सर्वांचे जीवन सारखे नाही. काही शेतकऱ्यांकडे चांगली जमीन, भरदार बैल आणि तुलनेने सुखी संसार आहे; तर काहींच्या घरात उपासमार, कर्ज, श्रम आणि अभाव आहे. बैलांच्या वर्णनातून ही विषमता अत्यंत प्रभावीपणे पुढे येते. श्रीमंत शेतकऱ्यांची बैलं सजवलेली आणि तेजस्वी दिसतात; तर आनंदाच्या घरची बैलं कृश आणि उपाशी आहेत. ही विषमता यादव उपदेशाच्या भाषेत सांगत नाहीत. ते तिचे चित्र उभे करतात. म्हणूनच ती अधिक प्रभावी होते. यादव लिहितात -

"गावाचं वैभव बाहेर पडल्यागत वाटत होतं... आमचीबी बैलंच. कायम वाळून कोंज झालेली. त्यांच्या पोटापाण्याला कधी भरपूर मिळायचं नाही. आम्हा भणी-भावंडांसारखंच त्यांही नशिबी भरपूर कष्ट नि उपासमार आलेली असायची." (यादव , ३०२)

यावरून, वाचकाला गाव म्हणजे समान दुःखाचे एकच जग नाही, तर वेगवेगळ्या स्तरांचे जग आहे, याची जाणीव होते.

कादंबरीतील अनेक व्यक्तिरेखा एका कामावर अवलंबून नसतात. शेती, मोलमजुरी, गुळाच्या घाण्यावरचे काम, सुगीतील कापणी, घरांची शाकारणी अशा अनेक कामांतून जगण्याचा आधार शोधला जातो. यातून ग्रामीण जीवनातील श्रमाची व्यापकता दिसते. वर्षातील प्रत्येक ऋतू वेगळे काम घेऊन येतो. पाऊस, सुगी, उन्हाळा, लग्नसमारंभ, सण - प्रत्येक काळाचा जगण्याशी संबंध आहे. परंतु एवढे काम करूनही सुरक्षितता नाही. कष्टाच्या मानाने मिळणारे उत्पन्न कमी आहे. त्यामुळे मुलांना शिक्षणापेक्षा कामाला लावण्याची वेळ येते. आनंदाच्या आयुष्यातील शिक्षणाचा संघर्ष याच पार्श्वभूमीवर समजतो.

यादवांच्या ग्रामीण जगात श्रम हे प्रतिष्ठेचे साधन आहे; पण श्रम करणाऱ्याला त्यातून हमखास समृद्धी मिळते असे नाही. ही विसंगती ग्रामीण जीवनाच्या वास्तववादी चित्रणाला अधिक धार देते.

१५. ग्रामीण बोलीचे साहित्यिक सौंदर्य

*झोंबी*च्या प्रभावाचे एक महत्त्वाचे कारण तिची भाषा आहे. ग्रामीण बोली, तिचा लहेजा, वाक्प्रचार, संवादातील सहजता आणि कथनातील ताजेपणा यांमुळे कादंबरीचे जग जिवंत होते. "आनंदा", "हाय", "कुटली", "नाईतर", "मळ्यात", "शाळा राहू दे" यांसारख्या बोलीतील शब्दरचना ग्रामीण माणसाच्या जिभेचा नैसर्गिक आवाज जपतात.

ही भाषा केवळ सजावटीची नाही. ती व्यक्तिरेखांच्या स्वभावाची ओळख बनते. आईची भाषा, वडिलांची भाषा, मुलांची भाषा आणि गावातील इतर माणसांची भाषा त्यांच्या जगण्याची वेगवेगळी छटा व्यक्त करते. म्हणून *झोंबी*तील बोली ही ग्रामीण जीवनाचे बाह्य रूप नसून त्याच्या अंतःकरणाचा आवाज आहे. प्रमाणभाषेत सांगितले असते तर या अनुभवातील अनेक सूक्ष्म छटा हरवल्या असत्या.

बोलीभाषेचा वापर हा सांस्कृतिक दस्तऐवजीकरणाचाही भाग ठरतो. एखाद्या प्रदेशाची भाषा नष्ट होत गेली तर त्या भाषेत साठलेले अनुभव, वाक्प्रचार, भावछटा आणि जीवनदृष्टीही बदलते. त्यामुळे झोंबीतील बोली ही ग्रामीण संस्कृतीच्या स्मृतीचे भाषिक रूप आहे.

१६. ग्रामीण ते नागरी : आनंदाच्या अंतर्मनातील बदल

*झोंबी*मध्ये ग्रामीण आणि नागरी जग यांच्यातील अंतर हळूहळू कमी होत जाते. शिक्षण, रेडिओ, बाजार, आधुनिक साधने आणि बाहेरील जगाची ओळख यांमुळे आनंदाच्या मनात गावाच्या पलीकडील जगाचे आकर्षण निर्माण होते.

मात्र त्याचा ग्रामीण भूतकाळ त्याला सतत सोबत करतो. म्हणूनच आनंदाच्या मनात एक ग्रामीण आनंद आणि एक नव्या जगाकडे पाहणारा आनंद अशी द्विधा निर्माण होते. कादंबरीत या दोन रूपांतील संघर्षाची जाणीव स्पष्टपणे व्यक्त होते. यामुळे *झोंबी*चा संघर्ष फक्त बाह्य परिस्थितीशी राहत नाही. तो स्मृती आणि वर्तमान यांच्यातील संघर्षही बनतो. गाव मागे पडत जाते; पण गावाची भाषा, माती, आई, बैल, शेत आणि बालपणाची स्मृती आनंदाच्या मनातून नाहीशी होत नाही.

ही द्विधा झोंबीच्या शीर्षकातील 'झुंज' समजून घेण्यासाठीही महत्त्वाची आहे. एका बाजूला जन्मभूमीशी, मातीशी आणि कुटुंबाशी असलेली नाळ आहे; दुसरीकडे स्वतःचे भविष्य वेगळ्या दिशेने घडवण्याची इच्छा आहे. ग्रामीण ते नागरी संक्रमण त्यामुळे भौगोलिक स्थलांतरापेक्षा मानसिक स्थलांतर ठरते. माणूस गाव सोडण्यापूर्वी त्याच्या मनात गावाच्या पलीकडील जग निर्माण होते. आनंदाच्या बाबतीत शिक्षण ही मानसिक स्थलांतराची पहिली मोठी पायरी आहे.

१७. संक्रमणाचे साहित्यिक स्वरूप

*झोंबी*तील ग्रामीण संस्कृतीचे संक्रमण तीन पातळ्यांवर जाणवते. पहिली पातळी म्हणजे जगण्याच्या साधनांतील बदल—शेती, गिरणी, रेडिओ आणि नव्या साधनांचा प्रवेश. दुसरी पातळी म्हणजे लोकजीवनातील बदल—ओवी, सोंगी भजन, तमाशा, सण आणि सामुदायिक आनंदाचे बदलते स्वरूप. तिसरी आणि अधिक महत्त्वाची पातळी म्हणजे माणसाच्या मनातील बदल - शिक्षणाची ओढ, गावाच्या पलीकडील जगाची इच्छा आणि स्वतःचे आयुष्य स्वतः घडवण्याची धडपड. या तिन्ही पातळ्या एकमेकांपासून वेगळ्या नाहीत. गिरणी आली म्हणून ओवी थांबते; रेडिओ आला म्हणून बाहेरचे जग घरात येते; शिक्षण आले म्हणून आनंदाच्या मनात नव्या जीवनाची आकांक्षा निर्माण होते. त्यामुळे बाहेरच्या जगात घडणारा बदल आतल्या जगातही उमटतो.

या प्रक्रियेला 'संक्रमण' म्हणण्याचे कारण म्हणजे जुन्या आणि नव्या जगाचा सहअस्तित्वाचा काळ. जुने पूर्णतः संपलेले नसते आणि नवे पूर्णतः स्थिर झालेले नसते. या मधल्या अवस्थेत माणूस स्वतःची ओळख, आपली स्मृती आणि आपले भविष्य नव्याने समजून घेऊ लागतो. झोंबीमध्ये म्हणूनच संक्रमण हा केवळ सामाजिक बदल नसून अनुभवाचा आणि संवेदनांचा बदल आहे. मातीशी असलेले नाते, श्रमाची जाणीव, कुटुंबाविषयीची बांधिलकी, शिक्षणाची आकांक्षा आणि आधुनिकतेचे आकर्षण—या सर्वांचे परस्परसंघर्षातून आनंदाचे व्यक्तिमत्त्व तयार होते.

१८. *झोंबी* : बदलत्या ग्रामीण संस्कृतीची स्मरणकथा

*झोंबी*चे मोठेपण तिच्या अनुभवाच्या प्रामाणिकपणात आहे. यादवांनी ग्रामीण जीवनाकडे ना अंध भक्तीने पाहिले आहे ना तुच्छतेने. त्यांनी त्या जगातील माणुसकी, श्रम, उत्सव, नाती आणि लोकपरंपरा जपल्या; त्याच वेळी दारिद्र्य, अंधश्रद्धा, मारझोड, असमानता आणि शिक्षणातील अडथळे यांचेही दर्शन घडवले. त्यामुळे *झोंबी* वाचताना गावाबद्दलची एक मिश्र भावना निर्माण होते. हे गाव आपलेसे वाटते; पण त्याच वेळी त्यातील कष्ट आणि अभाव मनाला अस्वस्थ करतात. आधुनिक जगाची साधने आकर्षक वाटतात; पण त्यांच्या आगमनाने हरवलेल्या ओवीची आणि जात्याच्या घरघरची आठवणही येते.

यादवांच्या मते, बदल हा जीवनाचा अपरिहार्य भाग आहे. पण बदलाच्या वाटेवर मागे काय राहून जाते, याची जाणीवही तितकीच महत्त्वाची आहे. म्हणूनच *झोंबी*च्या शेवटी उभे राहणारे गाव हे भौगोलिक गाव नसून स्मृतीतील गाव आहे. लेखकाला आपल्या बालपणातील जगाची ओढ आहे; परंतु त्या जगातील गरिबी, मार, अंधश्रद्धा आणि असुरक्षितता यांचेही भान आहे. त्यामुळे झोंबीची स्मृती ही चिकित्सक स्मृती ठरते.

निष्कर्ष

आनंद यादवांची *झोंबी* ही एका गरीब ग्रामीण मुलाने शिक्षणासाठी केलेल्या संघर्षाची कथा म्हणून निश्चितच महत्त्वाची आहे; परंतु तिचे साहित्यिक विश्व त्यापेक्षा कितीतरी व्यापक आहे. या कृतीतून एका बदलत्या ग्रामीण संस्कृतीचे सूक्ष्म आणि जिवंत चित्र उभे राहते. शेतीच्या पारंपरिक जगण्यापासून आधुनिक साधनांकडे जाणारा प्रवास, बैलांच्या श्रमाशी जोडलेले जीवन, पिठाच्या गिरणीमुळे थांबलेली जात्याची घरघर, त्याबरोबर हरवणाऱ्या ओव्या, रेडिओच्या रूपाने घरात आलेले बाहेरचे जग, तमाशा-सोंगी भजनांनी फुलणारा सामुदायिक आनंद, गरिबीने छिन्नविछिन्न झालेले बालपण आणि शिक्षणासाठीची धडपड - या साऱ्यांतून ग्रामीण जीवनाच्या संक्रमणाचे अनेक पदर उलगडतात.

या संक्रमणात जुने जग पूर्णपणे नाहीसे होत नाही आणि नवे जग पूर्णपणे स्वीकारलेही जात नाही. दोन्हींच्या मध्ये माणूस उभा राहतो. आनंदाच्या आयुष्यातील संघर्ष हीच त्या मधल्या अवस्थेची सर्वाधिक प्रभावी प्रतिमा आहे. मळ्यातील काम त्याला जमिनीशी बांधून ठेवते; पुस्तक त्याला त्या जमिनीच्या पलीकडे पाहायला शिकवते. आई त्याला मातीची उब देते; शाळा त्याला नव्या जगाची चाहूल देते. बैल त्याच्या ग्रामीण बालपणाची स्मृती बनतात; रेडिओ नव्या काळाचा आवाज घेऊन येतो.

यादवांनी या बदलाचे मूल्यमापन एका बाजूने केलेले नाही. त्यांच्या संवेदनशील दृष्टीला नव्या साधनांमधील सोयही दिसते आणि त्यांच्यामुळे हरवणारे जुने स्वरही ऐकू येतात. म्हणूनच "काही मिळवायचे आणि काही गमवायचे" हे *झोंबी*च्या ग्रामीण संस्कृतीविषयक चिंतनाचे सार ठरते. विशेषतः "ओवी गेली आणि रेडिओ आला" हा बदल ग्रामीण संस्कृतीच्या संपूर्ण संक्रमणाचे प्रतीक ठरतो. एका आवाजाच्या जागी दुसरा आवाज येतो; एका जीवनपद्धतीच्या जागी दुसरी जीवनपद्धती उभी राहते. परंतु मागे राहिलेल्या आवाजाची स्मृती मनातून जात नाही. म्हणूनच *झोंबी* ही केवळ आत्मकथा नसून एका काळाच्या बदलत्या चेहऱ्याची साहित्यिक स्मरणकथा आहे.

अखेरीस, *झोंबी*मध्ये ग्रामीण संस्कृतीचे चित्रण हे निसर्गरम्य ग्रामीणतेचे चित्रण नसून माणूस, माती, श्रम, स्मृती आणि बदल यांच्या नात्याचे चित्रण आहे. गाव बदलते, शेती बदलते, साधने बदलतात, करमणुकीचे प्रकार बदलतात, शिक्षणाची वाट बदलते; पण या सगळ्या बदलांच्या मध्यभागी उभा असलेला माणूस आपल्या जुन्या स्मृती घेऊन नव्या जगाकडे जात राहतो. हाच *झोंबी*चा अंतःस्वर आहे आणि याच अर्थाने ती बदलत्या ग्रामीण संस्कृतीचे महत्त्वपूर्ण साहित्यिक दस्तऐवजीकरण ठरते.

संदर्भसूची

[१] यादव, आनंद. *झोंबी*. मेहता पब्लिशिंग हाऊस, डिसेंबर १९८७.

[२] यादव, आनंद. ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या. मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९७९.

[३] यादव, आनंद. ग्रामीणता : साहित्य आणि वास्तव. मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९८१.

[४] मांडवकर, पवन. "ग्रामीण आत्मचरित्रांचा प्रारंभकाळ." राष्ट्रीय परिषद, २०१६.

[५] पाटील, मीनाक्षी. "'झोंबी' – एक अभ्यास." *ग्रंथवेध : साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त ग्रंथ*, २०२५.

[६] फुले, रुपाली. *"झोंबी* – आनंद यादव." *वाचन संकल्प महाराष्ट्र*, जयकर ज्ञानस्रोत केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, १६ जानेवारी २०२५.